**Draft for website**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**मुलांचे वसतिगृह**

**इ-निविदा सुचना**

**क्र.संगाबाअवि/मुव/२६८/२०२५** **दिनांक :- ७.१०.२०२५**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहाची मेस कंत्राटी (ठेका) पध्दतीने दोन वर्ष कालावधीच्या करारावर शासन निर्णय क्र.रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१ दि.१७ ऑगस्ट, २००२ नुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र तसेच महिला बचत गट, संबंधीत स्वतंत्र व्यक्ती, खाजगी संस्था अशा पंजिबध्द नोंदणीकृत कंत्राटदारांकडून द्विलिफाफा पध्दतीने सिलंबंद इ-निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर माहीतीकरीता व महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या बेबसाईटवर दिनांक १०.१०.२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध असून सदर वेबसाईटवर निविदा भरता येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा आवेदनपत्राची किंमत १८% जी.एस.टी.सह | निविदा अनामत रक्कम (Deposit) | निविदा सादर करण्याची अंतिम तिथी दुपारी १.०० वाजता | निविदा उघड करण्याची तिथी दुपारी १.०० वाजता |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस चालविणे. | रु.६७३०/- | रु.५०,०००/- | ३१.१०.२०२५ | ४.११.२०२५ |

**अटी व शर्ती –**

१. उपरोक्त शासन निर्णय क्र.रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१ दि.१७ ऑगस्ट, २००२ नुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र तसेच महिला बचत गट, संबंधीत स्वतंत्र व्यक्ती, खाजगी संस्था अशा पंजिबध्द नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन द्विलिफाफा पध्दतीने इ-निविदा मागविण्यात येत आहे.

२. सदर निविदा दि. १०.१०.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत असून इ-निविदाद्वारे सदर निविदा सादर करण्याची शेवटची दि. ३१.१०.२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आहे. सादर झालेल्या निविदा उघडण्याची शक्यतो दिनांक ४.११.२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आहे. सदर निविदा, ई-निविदा कक्ष, अभियांत्रिकी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे उघडण्यात येतील.

३. करार कालावधीत कंत्राटदाराला दोन वर्षासाठी रु.८८,०००/- मेस भाडे (स्वयंपाकगृह, मेस, उपलब्ध उपस्कर रु.४८०००/-, विज बिल रु.२००००/- व पाणी बिल रु.२००००/-) आकारण्यात येत आहे.

४. मुलांचे वसतिगृहाची मेस कंत्राटी (ठेका) पध्दतीने **सदर करारनामा ज्या दिनांकास अस्तीत्वात येईल त्या दिनांकापासून पुढील २ वर्षाकरिता सदर कंत्राट राहील.**

५. निविदाधारकांनी लिफाफा क्र. १ मध्ये (I) कंत्राटदार/संस्था नोंदणी प्रमाणपत्र, (II) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे अधिनियम) नियम, २०१८ नोंदणी वैध प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली सत्यप्रत (शॉप ॲक्ट) , (III) अद्ययावत आयकर प्रमाणपत्र (३ वर्षाचे) (लागू पडत असल्यास), (IV) व्यवसाय कर प्रमाणपत्र, (V) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र (लागू पडत असल्यास), (VI) संस्था बेरोजगारांची असल्याबाबतचे व शासन

निर्णयानुसार अनामत भरण्यापासून सूट असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरण (सहा./उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय/जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र इत्यादी) यांचे प्रमाणपत्र, (VII) पॅन कार्ड (VIII) शासकीय / निमशासकीय संस्थेच्या वसतिगृहाची मेस

चालविल्याचे अनुभव असलेल्या सक्षम प्राधिकरणीचे प्रमाणपत्र (३ वर्षाचे), (IX) अन्न सुरक्षा व मानदे कायदा अधिनियम , २००६ अंतर्गत परवाना (अन्न व औषधी प्रशासन, महाराष्ट्र राज्य), (X) म.न.पा. अधिनियम १९४९ अंतर्गत अनुज्ञप्ती (बाजार परवाना – नसल्यास कंत्राट मिळाल्यापासून चाळीस दिवसाचे आत सादर करावा लागेल), (XI) Declaration Regarding Blacklisting / Debarring of taking part in Tender (Annexure-A), (XII) Fall Clause Certificate, (Annexure-B), (XIII) General terms & conditions (Annexure-C) व (XIV) प्रतिज्ञालेख इत्यादी.

६. वसतीगृह क्र.१, २ व ३ मधील विद्यार्थी अपेक्षित संख्या २२९ राहील.

७. वॉर्डन, मुलांचे वसतिगृह यांचे कार्यालयामध्ये नोटीस बोर्डवर सविस्तर निविदा सुचना पाहावयास मिळेल.

८. कोणतेही कारण न सांगता / न देता सदहू निविदा रद्द करण्याचे अधिकार कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

९. बेरोजगारांची संस्था नसलेल्या इतर संस्थानी निविदा अनामत रक्कम रु.५०,०००/- ऑनलाईन भरावी लागेल.

१०. **Online सादर केलेल्या Technical Bid ची संपुर्ण कागदपत्रासह एक प्रत दि. ३.११.२०२५ पर्यंत दुपारी १.०० वाजे पर्यंत केंद्रीय, आवक जावक कक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे सादर करावी लागेल.**

११. www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Technical Bid, Commercial Bid, Annexure-A, Annexure-B, प्रतिज्ञालेख , Annexure-C, Agreement (Annexure - D), इत्यादी अपलोड करण्यात आलेला आहे.

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रतिलीपी माहीतीस्त्व -**

१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२. प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निविदा सूचना वेबसाईटवर प्रसिध्द करण्याकरीता.
३. उपकुलसचिव (लेखा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४. उपकुलसचिव (अंकेक्षण), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
५. सहा.कुलसचिव (प्रशा.), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रत माहिती व प्रसिध्दी देण्यास्तव.**

५. उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार विभागीय मुख्यालय, गांधी चौक, अमरावती.
६. सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्र, दत्त पॅलेस, गांधी चौक, अमरावती यांना विनंती की, उपरोक्त निविदा कृपया सूचना बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र यांना वितरीत करावी.
७. नोटीस बोर्ड.